**K.P.C PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT IV - 2023-24**

**GRADE:VIII**
**SUBJECT: MARATHI**

**MARKS :100**
**TIME: 3HRS**

---

**विभाग अ- गद्य व पद्य (५४)**

**प्र.१.अ)खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)


आता माझं लक्ष एका गोष्टीकडं जातं. प्रत्येक मांजराच्या कप्प्यामध्ये त्याचं नाव लिहिलेलं आहे. 'जॅक जाधव', 'बकुल गोखले', 'सॅमी डिकुन्हा', 'रोमल टिपणीस' ! माझ्या ध्यानात येतं, ही आहेत मांजरांना दिलेली त्यांच्या मालकांची आडनावं !

त्या जाधव, गोखले, टिपणीस इत्यादी मंडळींचा डोळ्यांनी निरोप घेऊन मी बाहेर पडते. मला निरोप देताना पुन्हा एकदा 'मियाँव'चा गजर होतो. भेटीला आलेला माणूस परत जायला निघाला म्हणजे इस्पितळाच्या पेशंटच्या चेहऱ्यावर जी खिन्नता दिसते, तीच या मांजरांच्या चेहऱ्यावर मला दिसली. घरी लाड करून घ्यायची सवय झालेल्या या मांजरांना इथं विलक्षण एकटं एकटं वाटत असलं पाहिजे.

"या मांजरांना औषधपाणी माणसांसारखं करतात का रे?" मी भरतला विचारलं.

"तर तर!" असं म्हणून भरत सांगतो, "त्यांचं खाणंपिणं पथ्याचं असतं, बाई." एकदम भरतला काहीतरी आठवतं. तो मला म्हणतो, "बाई, शेजारी कुत्र्यांचा विभाग आहे,तिथं जाऊया जरा.

**प्र.१)आकृती पूर्ण करा.** (२)




**प्र.२)एका शब्दात उत्तर लिहा.** (३)

१)मांजरांना दिलेली नावे कुणाची-________

२)लेखिकेला निरोप देताना होणारा गजर -_________

३)मांजरांच्या चेहऱ्यावर लेखिकेला दिसली -_________.

प्र.३)मांजरांना विलक्षण एकटे वाटते कारण_______. कारण लिहा. (१)


प्र.४)या मांजरांना माणसांसारखं_______ करतात का.(रिकाम्या जागी योग्य शब्द भरा) (१)

**प्र.१.ब)खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

गिर्यारोहणाचा अनुभव खरोखर रोमांचक होता आकाशाला स्पर्श करणारे उंच पहाड, विशाल काय खडक, हिरव्यागार घाटी आणि वेगाने वाहणाऱ्या. स्वच्छ पाण्याच्या पहाडी नदया ईशान आणि त्याच्या साथीदारांना साद घालत होत्या. त्यांना जेव्हा संधी मिळेल,तेव्हा ते आवश्यक उपकरणे आणि सामानाची बॅग घेऊन गिर्यारोहण करायला जात असत.उत्तर काशीच्या गिर्यारोहण संस्थेचा संदेश वाचल्यावर ईशान फारच खूश झाला. त्याने लगेच या ये निमंत्रणाची माहिती आपले मित्र धैर्य, प्रशांत, अमन आणि सक्षम यांना दिली. सर्वच मित्र फार खूश झाले. ते जणू ने सुट्टीत पहाडावर जाण्याची वाटच पाहत होते. शाळेला सुट्टी लागण्यापूर्वीच त्यांनी पहाडावर जाण्याची तयारी सुरू केली होती. -शाळेला सुट्टी लागल्याबरोबर सर्व मित्र टॅक्सीने ऋषिकेशहून उत्तर काशीला पोहोचले. वाटेत उंच उंच पहाड पाहून ते फार रोमांचित झाले होते.

गिर्यारोहण संस्थेच्या आपल्या साथीदारांना भेटल्यावर ईशान आणि त्याचे मित्र खूप उत्साहित झाले होते. सर्व मित्रांनी मिळून माऊंटेनिअरिंगच्या साहाय्याने उत्तर काशीहून गंगोत्रीला जाण्याचा निश्चय केला.

**प्र.१) आकृती पूर्ण करा .** (२)




**प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

ईशान व त्याचे मित्र संधी मिळेल तेव्हा काय करत होते?

प्र.३) ईशान फारच खुश झाला कारण________?( कारण लिहा) (१)

प्र.४)एका शब्दात उत्तर लिहा. (३)

१)याच्या सहाय्याने काशी होऊन गंगोत्री ला जाण्याचा निश्चय केला _____

२)ऋषिकेशहुन उत्तर काशीला ईशान व त्याचे मित्र असे पोहोचले_____

३)या गोष्टी घेऊन ईशान व साथीदार गिर्यारोहण करायला जात___

**प्र.२.अ) खालील पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा.** (७)


भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले!

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले !

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले!

सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले !

प्र.१)आकृती पूर्ण करा. (२)



**प्र.२)एका वाक्यात उत्तर लिहा.** (२)

१) वृक्षाची स्थितप्रज्ञता आपल्याला काय शिकवते?

२) तुळशीवरल्या पणतीने काय शिकवले आहे?

**प्र.३)कवितेच्या ओळी पूर्ण करा.** (२)

बुलंद तरीही असे सोसले

______________________

______________________

दाणे मजला शिकून गेले.

**प्र.४)यमक जुळवणाऱ्या जोड्या लावा.** (१)

१)ठावे- २) हौसले-

**प्र.२.ब) खालील पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा.** (७)

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी दयावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

प्र.१) आकृती पूर्ण करा . (२)

१)सानुल्या झुळकेच्या इच्छा

↓

१) ________

↓

२) ________

↓

३) ________

↓

४) ________

प्र.२) चौकट पूर्ण करा. (२)

१)शेताचा रंग → ________

२)मखमली कोण → ________

प्र.३) झुळकेने कलीकेला स्पर्श केला कारण ______(कारण लिहा ) (१)

प्र.४)'पाचूचे मखमली शेत' तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. (२)

**प्र.३.अ) खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा. (७)**

कला ही विविध गोष्टीतून आपणास दिसून येत असते. ही कला जोपासण्याचे व तिचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे काम हे आपणा सर्व मानव जातीस करावे लागते. अश्या या कलेचे कोणकोणते उपयोग आपणास होतात व त्यामुळे मानवी संस्कृती कशी अबाधित राहते ते यातून आपणास दिसून येते.एखाद्या कलाकारास त्याचे विचार जगासमोर आणायचे असतील तर कलेच्या विविध माध्यमातून तो आणता येतो. चित्रकला, शिल्पकला, नाट्यकला अश्या माध्यमातून रेखाटलेली कला वा मांडलेला अविष्कार हा पुढील पिढीपर्यंत पोहोचवता येतो.कोणतीही गोष्ट त्याच्या कलेने करणे म्हणजे कला! एखादी कला अवगत असल्याने त्या कलाकाराला लोकप्रियता मिळते. कला निर्माण होते ती स्वतःमध्ये असलेल्या सुप्त गुणांमुळे. कला ही विविध पर्यायांच्या रूपात दिसून येते.


कलेचे दोन उपयोग-

१)सगळं संपेल पण कलाच साथ देईल

२) कला माणसं बांधते

म्हणून प्रत्येकाने एक तरी कला आपल्या अंगी जोपासावी.

प्र.१) आकृती पूर्ण करा (३)




२) कला निर्माण यामुळे होते ती→ ______

प्र.२) एखादा कलाकार आपले विचार कसे व्यक्त करतो? (एका वाक्यात उत्तर लिहा) (१)

प्र.३)कला ही विविध _____ रूपात दिसून येते.(रिकामी जागा पूर्ण करा.). (१)

प्र.४) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) या उताऱ्यात कशाविषयी माहिती सांगितली आहे_____

२) कला अवगत असल्याने कलाकाराला काय मिळते_____

**प्र.३.अ) खालील अपठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा. (७)**

बघ आई आकाशात सूर्य हा आला|
पांघरून अंगावरी भरजरी शेला||
निळ्या याच्या महालाला खांब सोनेरी|
मोतीयांच्या लावियेल्या आत झालरी||
केशराचे घातलेले सडे भूवरी|
त्यावरून येई त्याची डौलाने स्वारी||
डोंगराच्या आडून हा डोकावे हळू|
आणि फुले गुलाबाची लागे ऊधळू||
नभातून सोनियाच्या ओती तो राशी|
गुदगुल्या करी कश्या कळ्या फुलांसी||
पाखरांच्या संगे याची सोबत छान|
गाती बघ कशी याला गोड गायन||

मंद वारा जागवीतो साऱ्या जगाला|
म्हणतसे ऊठा ऊठा मित्र हा आला||


प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) डोंगराच्या आडून डोकावणारा-_____

२) साऱ्या जगाला जागविणारा-___

प्र.२) आकाशात सूर्य कसा आला? (एका वाक्यात उत्तर लिहा.) (१)

प्र.३) आकृती पूर्ण करा. (२)




प्र.४) कवितेच्या ओळी पूर्ण करा. (२)

नभातून _______ ओती तो _____|
_______ करी कश्या _____ फुलांसी||

**प्र.३.क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) (१२)**

१)तुम्हाला जाणवलेली ईशानची गुणवैशिष्ट्ये लिहा.

२)'दुसऱ्यांसाठी घाव सोसणे' या ओळीतील तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

३)'बिनभिंतींची शाळा' लाखो इथले गुरू हा विचार स्पष्ट करा.

४)'झुळकेची परोपकारी वृत्ती' तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

५)'माणसाच्या दयाबुद्धीला करुनेला मुके प्राणी कसे आवाहन करतात' याबाबतचा तुमचा अनुभव तुमच्या शब्दात लिहा.

## विभाग ब-व्याकरण विभाग (२४)

**प्र.४.अ) कंसातील सूचनेनुसार कृती करा.**

**१)खालील अव्ययचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य बनवा.** (२)

१) किंवा २) अत्यंत

**२) रचनेवरून वाक्याचा प्रकार ओळखा.** (२)

१)आजीने नातवाला गोष्ट सांगितली.

२)जो चढतो तोच पडतो.

**३) अर्थावरून वाक्याचा प्रकार ओळखा.** (२)

१)शेतकऱ्यांचा विकास व्हायला हवा

२)सूर्य नसता तर!

**४) समानार्थी शब्द लिहा.** (२)

१) वृक्ष- २) अंग-

**५)विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(२)**

१)जळणे × २) मुका ×

**६) कंसातील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी लिहून वाक्य पुन्हा लिहा.** (२)

(आवाहन करणे, निभाव लागणे, प्रसार होणे)

१)सुधाकरचा कबड्डीच्या सामन्यात आपल्या मित्रांसमोर काहीच_______________.

२)पोलिसांनी गावकऱ्यांना मदतीसाठी______________

७) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करा. (२)

१)कुत्रे मांजरी ससे हरिण हे सर्व प्राणी मी पाहिले

२)तुझ्या मते मी काय करायला हवे होते

८) वचन बदला. (२)

१) बाटली- २) जाळ्या-

९)खालील वाक्यांचा काळ ओळखा. (२)

१)मित्र माझ्यासाठी भेटवस्तू आणणार आहे.

२)मी रोज तीन किलोमीटर चालतो.

१०) उपसर्ग व प्रत्यय लावून नवीन शब्द तयार करा. (२)

१) ज्ञान २) शकुन

११) पुढील शब्द शुद्ध स्वरूपात लिहा. (२)

१)सरवांग २) बकूळि

१२) खालील शब्दांचे सामान्य रूप लिहा. (२)

१)आवाजांचा २) मुखावर

## विभाग क - लेखन विभाग (२२)

**प्र.५.अ) खालील कोणत्याही एका विषयावर१०० ते १५० शब्दात निबंध लेखन करा.** (७)

१) दिवसेंदिवस वाढत चाललेली नैसर्गिक आपत्तीची समस्या

२) झाडांचे मनोगत


प्र.५.ब) खालील विषयावर पत्र लेखन करा . (५)

१)समीक्षा कानेटकर, समर्थ सोसायटी, नगर येथून आपल्या परिसरातील विभागीय अधिकारी, नगर महानगरपालिका, नगर यांना भटक्या कुत्र्यांच्या होणाऱ्या त्रासाबद्दल तक्रार पत्र लिहीत आहे.

**प्र.६.अ) खालील शीर्षकावरून कथा तयार करा व तात्पर्य तुमच्या शब्दात लिहा.** (५)

१)सोन्याची अंडी देणारी कोंबडी

**प्र.६.ब)खालील जाहिरात वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.** (५)




**प्र.१) उच्च दर्जाचे व स्वादिष्ट केक मिळण्याचे एकमेव ठिकाण कोणते?** (१)

२) वरील जाहिरातीमध्ये कोणती टीप देण्यात आली आहे? (१)

३) मोरया बेकरी ही कोणत्या शहरात आहे? (१)

४) बेकरीमध्ये कोणकोणते पदार्थ ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळतील? (२)

किंवा

**प्र.६.ब.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर जाहिरात वाचून आकर्षक जाहिरात करा.** (५)

१) इको फ्रेंडली गणपतीच्या मखराची जाहिरात करा.